मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 29 एप्रिल 2025 | पान- 1

# नदी सुधार प्रकल्प तूर्तास थांबवा!

## विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची महापालिका आयुक्त यांना सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

नदी सुधार प्रकल्प राबवून पिंपरी चिंचवड शहरातील नद्यांवर अन्याय केला जात आहे या नागरिकांच्या भूमिके विषयी विचार केला जाईल. तूर्तास हे काम थांबवण्याचे आदेश पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांना दिले असल्याचे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी सांगितले.



पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक, पर्यावरणप्रेमी व सामाजिक संस्थांनी नदी सुधार प्रकल्पाला विरोध दर्शवला असून सातत्याने आंदोलने केली जात आहेत. रविवारी (२७ एप्रिल) पुन्हा नदी सुधार प्रकल्पाच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. यावेळी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी मुळा नदीकाठी आंदोलकांची भेट घेतली. नदी सुधारच्या नावाखाली तसेच शहरात होत असलेल्या बेकायदेशीर वृक्षतोडीबाबत पर्यावरण प्रेमींनी बनसोडे यांना माहिती दिली. त्यावर अण्णा बनसोडे यांनी नदी सुधार प्रकल्पाचे काम तात्काळ थांबवण्याच्या सूचना पुणे आणि पिंपरी-चिंचवड मनपा आयुक्तांना दिले आहेत.

पिंपळे निलख येथील शहीद अशोक कामठे उद्यान ते पिंपळे निलख स्मशानभूमी जवळील नदी पात्रा पर्यंत नागरीक व पर्यावरणप्रेमींनी पदयात्रा काढली. या पदयात्रेत सुमारे तीन हजार नागरिकांनी सहभाग घेतला.

आंदोलकांनी यावेळी आपली भूमिका मांडली. नदी सुधार प्रकल्प राबवताना नदी काठची सुमारे ४० हजार झाडे तोडली अथवा पुनर्रोपणाच्या नावाखाली मारली जाणार आहेत. नदीकाठच्या अनेक देवराया नष्ट केल्या जाणार आहेत. या नदी सुधार प्रकल्पामुळे जैव विविधता नष्ट होणार आहे. नद्यांचे पात्र अरुंद होऊन पुराचा धोका वाढणार आहे. विदेशातील नद्यांचे अनुकरण करून पिंपरी-चिंचवड शहरात नदी सुधार प्रकल्प सुरु केला जात आहे. मात्र परदेशात आता तटबंध काढून नद्या नैसर्गिक रुपात आणण्याच्या योजना सुरू आहेत. आरोप यावेळी आंदोलकांनी केले.

> “ या कामाची चौकशी करून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केली जाईल. त्यानंतर नदी सुधार प्रकल्पाबाबत निर्णय घेतला जाईल, अवैधपणे वृक्षतोड करून पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. त्याबाबत संबंधितांना सूचना दिल्या जातील.
>
> **- अण्णा बनसोडे, उपाध्यक्ष, विधानसभा.**

---

# महापालिकेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून 'सेवा हक्क' शपथ

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी घेतली सेवा हक्क दिनानिमित्त शपथ

**पिंपरी | प्रतिनिधी**

“आम्ही गांभीर्यपूर्वक शपथ घेतो की, आम्ही महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत शासनाच्या सेवा पारदर्शक पद्धतीने विहित कालमर्यादित व सौजन्याने पात्र नागरिकांना देण्याकामी आम्हाला सुपूर्द करण्यात आलेली जबाबदारी पूर्ण प्रामाणिकपणे, निष्ठेने, सचोटीने, संवेदनशीलतेने व तत्परतेने पार पाडण्यासाठी कटीबद्ध राहू. आम्ही सेवा वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही यासाठी आवश्यक ती पावले उचलू तसेच आम्ही नागरिकांना उक्त कायद्याने प्रदान केलेल्या सेवेच्या हक्कांचा आदर ठेवून व सेवा भाव ठेवून त्यांच्या हितार्थ व कल्याणार्थ काम करू” अशा आशयाची शपथ आज महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचा-यांनी आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली घेतली.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सेवा हक्क दिन व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या दशकपूर्ती निमित्त महानगरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आज प्रशासकीय भवनात महानगरपालिका कर्मचाऱ्यांमध्ये आपल्या सेवा हक्का हक्काबाबत जागरूकता निर्माण व्हावी याकरिता महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लोकसेवा सेवा हक्काची शपथ घेतली.

यावेळी उप आयुक्त विठ्ठल जोशी, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, प्रशासन अधिकारी साधना बोर्डे, मुख्य लिपिक मोरे, अनिल कुऱ्हाडे यांच्यासह महानगरपालिका कर्मचारी उपस्थित होते.

राज्यातील नागरिकांना सर्वोत्तम सेवा सुविधा देण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने राज्यात आज (२८ एप्रिल) रोजी सेवा हक्क दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सेवा हक्क दिन व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या दशकपूर्ती निमित्त आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार प्रशासन सेवेत नागरी सहभाग वाढविण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# ‘बीडीपी’त बांधकाम नकोच!

## पुनर्विचार अभ्यास गटाला ‘ग्रीन पुणे मूव्हमेंट’ने विरोध दर्शविला

**पुणे | प्रतिनिधी**

राखीव टेकड्यांवर बांधकामास परवानगी द्यावी का, याचा पुनर्विचार करण्यासाठी निवृत्त प्रशासकीय अधिकारी रमानाथ झा यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास गटाला ‘ग्रीन पुणे मूव्हमेंट’ने विरोध दर्शविला आहे. अशा स्वरूपाची परवानगी दिल्यास व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशारा ‘ग्रीन पुणे मूव्हमेंट’च्या वंदना चव्हाण यांनी शनिवारी दिला.

जैवविविधता उद्यानासाठी (बीडीपी) राखीव क्षेत्राचा निर्णय महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये एकमताने मंजूर झाला होता. २०१५ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्याला पाठिंबा दिला होता. २०१८ मध्ये जमीनधारकांना भरपाई देण्याची घोषणादेखील करण्यात आली होती. त्यामुळे हा विषय आधीच निश्चित झालेला असताना आता त्यावर कोणताही पुनर्विचार अस्वीकारार्ह असल्याची भूमिका वंदना चव्हाण यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत मांडली. ‘ग्रीन पुणे मूव्हमेंट’च्या अनिता गोखले-बेनिंजर, अमेय जगताप, रवींद्र सिन्हा, सुमिता काळे, पुष्कर कुलकर्णी या वेळी उपस्थित होते.



पुणे महापालिकेच्या हद्दीसह पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत असलेले जैवविविधता उद्यान, तसेच डोंगरमाथा व डोंगर उतारावर किती बांधकामे झाली, याचे सर्वेक्षण केले जाणार आहे. राज्य सरकारने नियुक्त केलेल्या रमानाथ झा यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. त्या संदर्भात चव्हाण म्हणाल्या, ‘बीडीपी राखीव क्षेत्रांमध्ये बेकायदा बांधकामे रोखण्याची स्पष्ट जबाबदारी महाराष्ट्र शासन आणि पुणे महापालिकेची होती. दुर्दैवाने, दोघेही या बाबतीत पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. यापूर्वी या क्षेत्रांच्या उपग्रह प्रतिमा प्रत्येक सहा महिन्यांनी घेतल्या जातील आणि एक समर्पित पथक नियुक्त केले जाईल, जे टेकड्यांचे संरक्षण करील, असे सांगण्यात आले होते. मात्र, या महत्त्वपूर्ण उपायोजना कधीच अमलात आणल्या गेल्या नाहीत. त्यामुळे अतिक्रमण सुरूच राहिले. जर आता तातडीने सुधारणात्मक पावले उचलली नाहीत, तर पुणेकरांना शहराच्या नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी व्यापक जनआंदोलन उभारावे लागेल.’

सरकारने ‘बीडीपी’संदर्भात अभ्यास गट स्थापन करण्याची अधिसूचना जारी केल्यानंतर पुणेकरांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. त्यासाठी ग्रीन पुणे मूव्हमेंटने ऑनलाइन आणि ऑफलाइन स्वाक्षरी मोहीम सुरू केली असून, त्याला २५ हजारांहून अधिक पुणेकरांनी प्रतिसाद दिला. विद्यार्थी, रहिवासी, स्वयंसेवक, पर्यावरण गटांनी संकलित केलेल्या सह्या महापालिकेला सादर केल्या जाणार आहेत.

### ‘ग्रीन पुणे मुव्हमेंट’च्या मागण्या

- **बीडीपी राखीव क्षेत्राची पूर्ण आणि तातडीने अंमलबजावणी**
- **३१ डिसेंबर २००२ पूर्वी नियमित न झालेल्या टेकड्यांवरील बांधकामांना कोणतीही परवानगी नाही.**
- **अभ्यास गट रद्दबादल करून बीडीपी प्रत्यक्ष अंमलबजावणीची सुरुवात करावी.**
- **अतिक्रमण रोखण्यासाठी समर्पित पथकाची नियुक्ती आणि नियमित उपग्रह नकाशांकन.**
- **नागरिकांच्या सहभागासह टेकडी संरक्षण कार्यदलाची स्थापना.**

# पावसाळापूर्व कामांसाठी 61 रस्त्यांवर परवानगी

## शहरातील रस्ते काही काळ वाहतूक बंद ठेवण्यास वाहतूक पोलिसांची मान्यता

**पुणे | प्रतिनिधी**

पावसाळापूर्व कामे करण्यासाठी महापालिका प्रशासनाने वाहतूक पोलिसांकडे शहरातील रस्ते काही काळ बंद ठेवण्याची परवानगी मागितली होती. त्यानुसार, पोलिसांनी ६१ ठिकाणी कामे करण्याची परवानगी दिली असल्याने हे रस्ते अल्प काळासाठी बंद राहणार आहेत. शहरात पावसाळ्यात पाणी साचणारी २०१ ठिकाणे महापालिकेने शोधली आहेत. यंदाच्या पावसाळ्यात तेथे पाणी साचून राहू नये, यासाठी आवश्यक ते नियोजन महापालिकेने केले आहे. या ठिकाणांमध्ये शहरांतील विविध भागांचा समावेश आहे. पुढील एका महिन्यात ही सर्व कामे पूर्ण करणे आवश्यक असल्याने महापालिकेने वाहतूक



पोलिसांकडे ‘ना हरकत प्रमाणपत्र’ (एनओसी), तसेच ६३ रस्त्यांचा प्रस्ताव पाठवून काम करण्यास मान्यता मागितली होती. त्यांपैकी ६१ ठिकाणी काम करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी मान्यता दिल्याचे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

पोलिसांनी ‘एनओसी’ दिल्याने लवकरच या कामांना सुरुवात होणार आहे. गेल्या काही वर्षांत कमी वेळात अधिक पाऊस पडून रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचते. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. यंदा हे टाळण्यासाठी महापालिकेने तयारी सुरू केली आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन योजनेंतर्गत शहरात २३ ठिकाणी पावसाळापूर्व कामे केली जाणार आहेत. त्यासाठी २१ ठिकाणी रस्ते खोदाई करावी लागणार आहे. त्यामुळे या रस्त्यावरील वाहतुकीचे नियोजन करावे लागणार आहे. पोलिसांनी ही कामे करण्यास तत्त्वतः परवानगी दिली आहे.

### दोन ठिकाणी खोदाईस नकार

- **पोलिसांनी सिंहगड रस्त्यावरील रांका ज्वेलर्सजवळ आणि वैभव टॉकीजजवळ खोदाईची परवानगी नाकारली आहे. येथे काम करण्यासाठी परवानगी देताना संबंधित कनिष्ठ अभियंता, काम करणारा ठेकेदार यांचा जबाब घेऊन महापालिकेच्या जबाबदारीवर ही परवानगी देण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे.**

# महापालिकेच्या आदेशाला जाहिरातदारांची केराची टोपली

## शहरातील होर्डिंगवर जाहिराती कायम - दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण?

**पिंपरी | प्रतिनिधी**

अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यांमुळे होर्डिंग कोसळून दुर्घटना घडू नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून दोन महिने होर्डिंगवर जाहिरात न लावण्याचे आदेश महापालिका प्रशासनाने दिले होते. शहरातील सर्व होर्डिंगवर १५ एप्रिल ते १५ जून असे दोन महिने जाहिरात बॅनर लावता येणार नाहीत. होर्डिंग रिकामे असतील, असा निर्णय पालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने घेतला. मात्र, त्याला केराची टोपली दाखवत शहरातील होर्डिंग मालकांनी जाहिरात व्यवसाय सुरुच ठेवला आहे. त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित केला जात आहे.




### किवळे प्रकरणाचा विसर?

» वादळी वाऱ्यामुळे किवळे येथील जाहिरात होर्डिंग कोसळून ५ जणांचा मृत्यू झाला. तर, ३ जण जखमी झाले होते. हा प्रकार १७ एप्रिल २०२३ ला घडला होता. तसेच, शहरात अनेक ठिकाणी होर्डिंग कोसळून दुकान, टपऱ्या व वाहनांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे खबरदारी म्हणून महापालिकेने पावसाच्या सुरूवाती. च्या काळात दोन महिने होर्डिंगवर जाहिराती न लावण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, होर्डिंगचालक, धारक व जाहिरात एजन्सीवाले उत्पन्न बुडू नये म्हणून जाहिराती करीत आहेत. किवळे सारख्या गंभीर प्रकरणाच्या त्यांना विसर पडल्याचे दिसून येत आहे.

शहरातील जाहिरात होर्डिंगचालक व धारक आणि आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या अधिकाऱ्यांची ९ एप्रिलला महापालिकेत बैठक झाली. वादळी वारे, अवकाळी पावसामुळे होर्डिंग कोसळून अपघात घडण्याची शक्यता असते. त्यात जिवित व वित्त हानी होऊ शकते. त्यामुळे पावसाळ्यापूर्वीच्या १५ एप्रिल ते १५ जून असे दोन महिने होर्डिंगवर जाहिरात बॅनर न लावण्याच्या सूचना होर्डिंगचालकांना देण्यात आल्या. त्याला होर्डिंगचालकांनी सहमती दिली होती.

> खबरदारी म्हणून शहरात १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत होर्डिंगवर जाहिरात न लावता ते रिकामे ठेवावेत. होर्डिंगचे स्ट्रक्चर खराब झाले असल्यास ते तातडीने दुरूस्त करून घ्यावे, असा स्पष्ट सूचना होर्डिंगचालक व मालक तसेच, जाहिरात एजन्सींना दिल्या आहेत. त्यानुसार होर्डिंगवरील जाहिरात काढली का नाही, हे तपासणे सुरू आहे. ज्यांनी जाहिरात काढली नाही, त्यांना पुन्हा सूचना दिल्या जात आहेत. शहरातील एकाही होर्डिंगवर या काळात जाहिरात लागणार नाही, विभागाच्या वतीने याची पुरेपुर काळजी घेतली जात आहे.
> - डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, आकाशचिन्ह व परवाना विभाग.

मात्र, ती मुदत सुरू होऊन तेरा दिवस उलटले तरी, शहरातील बहुतांश होर्डिंगवर जाहिरात दिसत आहेत. गृहप्रकल्प, राजकीय नेत्यांचे वाढदिवस, त्यांचे दौरे, कार्यक्रम, वाढदिवसाच्या शुभेच्छा अशा जाहिरात झळकत आहेत. शहरातील होर्डिंग मालकांनी जाहिरात व्यवसाय सुरुच ठेवला आहे. त्यामुळे एखादी दुर्घटना घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित केला जात आहे.जाहिरातीद्वारे मिळणारे उत्पन्न बुडू नये म्हणून होर्डिंगचालक व धारक महापालिकेच्या निर्णयाकडे दुर्लक्ष करत आहेत.

# सार्वजनिक ठिकाणी आता कृत्रिम सावलीची नामुष्की

## शहरातील वृक्षसंपदा नामशेष होत असल्याने शासनाच्या सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाचा चटका कितीही वाढला तरी कृत्रिम सावलीची गरज कधी पडली नव्हती, कारण सार्वजनिक ठिकाणी पुरेसी झाडांची सावली होती. मात्र वाढते शहरीकरण व विकासाच्या नावाखाली शहरातील वृक्षसंपदा नामशेष होत चालली आहे. वृक्ष संवर्धन करणारी यंत्रणाच वृक्षांच्या मुळावर उठली असल्याने उष्णतेची तिव्रता वाढली आहे. रस्त्यालगतची झाडे तोडली गेली आहेत. त्यामुळे आता सार्वजनिक ठिकाणी कृत्रिम सावली करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवली आहे. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने उष्णतेच्या लाटेसंदर्भात तशा मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.



### आरोग्य विभागाला या सूचना

» उष्णतेच्या लाटेशी संबंधित आजार निरीक्षण आणि अहवाल तयार करणेसाठी नोडल अधिकारी नियुक्त करावे. प्रत्येक आरोग्य केंद्राच्या परिसरात उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्या संबंधित माहिती फलक लावावेत.

त्याअनुषंगाने राज्य शासनाचे अवर सचिव संजीव राणे यांनी संबंधित प्रशासकीय विभाग, महापालिका, नगरपालिका व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास उष्णतेच्या लाटांमुळे सार्वजनिक आरोग्याविषयी गंभीर समस्या निर्माण होण्याची संभावना लक्षात घेऊन, जिल्हा स्तरावरून उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, महापालिकेने या सूचनांना केराची टोपली दाखवली आहे. त्या सूचनेतील कोणत्याच उपाययोजना केल्या नसल्याचे दिसून येत आहे. याबाबत आपत्ती व्यवस्थापनाची जबाबदारी असलेले महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांना संपर्क केला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

### काय आहेत मार्गदर्शक सूचना

» बाजार, प्रमुख कार्यालये, बस स्टॅण्ड, टॅक्सी स्टॅण्ड, रिक्षा स्टॅण्ड इत्यादी सार्वजनिक ठिकाणी पुरेशी सावलीची व्यवस्था करावी. तसेच याठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करावी (पंखा/कुलर इ. नादुरुस्त असल्यास दुरुस्त करावे)

» सार्वजनिक ठिकाणी उष्णतेच्या लाटेशी संबंधित घ्यावयाची काळजी, संदर्भात पोस्टर्स/बॅनर्स लावावेत.

» उष्माघातापासून बचाव करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी प्रथमोपचार पेट्या ठेवाव्यात आणि त्याच्या वापराबाबत आवश्यक सूचना लिहाव्यात.

» टॅक्सी स्टॅण्ड, बस स्टॅण्ड (सरकारी/खाजगी), बाजार क्षेत्र आणि सरकारी कार्यालये या सार्वजनिक ठिकाणी पिण्याचे थंड पाणी उपलब्ध करावे.

» महापालिका आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शॉपिंग मॉल्समध्ये ग्राहकांसाठी आणि बाहेरील लोकांसाठी थंड पिण्याच्या पाण्याची सुविधा करावी. तसेच बाहेरील लोकांना पाण्याच्या उपलब्धतेबद्दल माहिती देण्यासाठी मार्गदर्शक फलक ठेवावे.

» उपलब्ध असल्यास रस्त्यावर पाणी शिंपडावे.

» सर्व उद्याने दुपारी १२ ते दुपारी ४ वेळेत खुली ठेवावीत.

# उजनी पाणलोट क्षेत्र बनतंय केळीच आगार

## इंदापूर तालुक्यातील साखर कारखान्यांना धोक्याची घंटा

पुणे | प्रतिनिधी

इंदापूर तालुक्यातील उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पळसदेव, चांडगाव, अगोती, वरकुटे बु, कालठण, पडस्थळ, शिरसोडी, माळवाडी आदीसह करमाळा तालुक्यातील कंदर, वाशिंबे, टाकळी, पोमलवाडी, खातगाव, कुगाव, चिकलठाण या एकेकाळच्या पारंपरिक साखरपट्ट्यात ऊस पिकाला फाटा देऊन शेतकरी केळी लागवड करताना दिसत आहेत.

साखरपट्ट्यात केळी पिकाच्या लागवडीखालील क्षेत्र वाढल्याने यावर्षी अनेक सहकारी व खासगी साखर कारखान्यांना आपला ऊस गळीत हंगामाचा गाशा उसाअभावी लवकरच गुंडाळावा लागू शकतो. आगामी काळात साखर कारखान्यांना ही धोक्याची घंटा मानली जात आहे. उजनी धरण पाणलोट परिसरातील शेतकरी आता, पारंपारिक ऊस पिकाला बगल देत, निर्यातक्षम दर्जाची केळी लागवड करायला पसंती देत आहेत. ऊस पीक तयार होऊन गाळपास लागणारा लागणारा कालावधी व गाळप होऊन प्रत्यक्ष हातात पैसे येण्यासाठी जास्त दिवस लागतात किंबहुना येतील की नाही याची देखील शाश्वती नसते. तुलनेत केळी पिकाचे पैसे तात्काळ मिळतात तर उसाचे पैसे वेळेवर मिळतीलच याची शाश्वती नाही. असा शेतकऱ्यांचा अनुभव आहे.



### अर्थकारण बदलण्याची क्षमता

» केळी पिकांच्या संदर्भातील वाहतूक, कृषी निविष्ठा, केळी रोपवाटिका यासह पॅकिंग मटेरियल व्यवसायाला चालना मिळाली असून हजारो लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. परिसरातील अनेक शेतकऱ्यांची मुले केळी खरेदी- विक्री व्यवसायात उतरली असून त्यांना नवीन व्यवसाय मिळाला आहे. आणखी पायाभूत सुविधा निर्माण झाल्या तर भविष्यात या पिकांमध्ये मोठी संधी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असून परिसराचे अर्थकारण बदलण्याची क्षमता या पिकामध्ये निश्चित मानली जाते.

इंदापूर तालुक्यात एका साखर कारखान्याचे गाळप तर तब्बल तेरा लाख मे. टनावरून अडीच तीन लाख मे. टनांपर्यंत खाली आले आहे. करमाळा तालुक्यात अनेक कारखाने बंद असल्याने तालुक्याबाहेरील खासगी वा सहकारी साखर कारखान्याची मनधरणी करून ऊस गाळपासाठी द्यावा लागतो. अशा अनेक अडचणींचा सामना करीत शेतकरी केळी पिकाच्या लागवडीकडे वळाले असल्याचे दिसते. उजनी धरणाचे पाणलोट क्षेत्र आता केळीचे 'आगार' म्हणून नावारूपाला आले आहे.

### आखाती देशांतून मागणी

» उजनी लाभक्षेत्रातील केळीची प्रत चांगली असल्याने आखाती देशातून चांगली मागणी आहे. त्यामुळे दर ही मागील तीन ते चार वर्षापासून चांगला मिळत आहे. येथील शेतकऱ्यांनी प्रामुख्याने ग्रॅण्डनैन, वेलची, लाल केळी इत्यादी प्रकारची केळी लागवड केलेली आहे. येथील केळीला आखाती देशात मागणी आहे. तसेच खोडवा केळी पुणे, मुंबई सह उत्तर भारतातील मोठ्या शहरातून मागणी आहे. उजनी धरण पाणलोट क्षेत्र व लाभ क्षेत्रात वर्षभरात सुमारे पंधरा लाख मे. टन केळीचे उत्पादन होते. त्यापैकी चाळीस टक्के केळी स्थानिक बाजारपेठेत व देशातील इतर राज्यामध्ये विक्री होते. उर्वरित साठ टक्के केळीची आखाती देशात निर्यात होते.

> “ शेती व्यवसायामध्ये अलीकडच्या काळामध्ये आलेले आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून पिकांचा अभ्यास करून पारंपारिक पद्धतीने शेती न करता आधुनिक पद्धतीने शेती आमच्या पुढच्या पिढीचा युवा शेतकरी करीत आहे. ऊसापेक्षा कितीतरी पटीने केळीचे पीक फायदेशीर आणि शाश्वत असल्याने अलीकडच्या काळामध्ये आम्ही केळी पिकाकडे वळालो आहे.
>
> - महारुद्र पाटील, प्रगतीशील केळी उत्पादक शेतकरी

गेल्या हंगामात केळीला प्रति किलो 33 ते 30 रुपये एवढा उच्चांकी दर मिळाला आहे. त्यामुळे केळी पीक तोट्यात जात नाही हा केळी उत्पादकांना भरोसा आला आहे. सध्या केळीला 20 ते 22 रुपये दर मिळत असला तरी यापुढे निश्चितच केळीच्या दरात सुधारणा होईल अशी शेतकऱ्यांना अपेक्षा आहे.

उजनी धरण पाणलोट क्षेत्रामध्ये सर्वप्रथम जी- 9 जातीची केळी लागवड करण्यास पसंती दिली. त्यापासून ते केळी उत्पादकांना चांगला फायदा मिळाला. त्यानंतर उजनी धरणाच्या दोन्ही बाजूला इंदापूर व करमाळा भागात केळी पिकाचे क्षेत्र वाढले. आता हा साखर पट्टा केळीचे आगार झाला आहे.

# पहेलगाम हल्ल्यात संरक्षणात कमतरता

## केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठकीत मान्य केले -माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार

पुणे | प्रतिनिधी

केंद्र सरकारने सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक बोलावली होती आणि त्या बैठकीमध्ये लोकसभेचे राष्ट्रवादीचे नेतृत्व म्हणून खासदार सुप्रिया सुळे हजर होत्या. त्या बैठकीमध्ये हीच चर्चा झाली. पण, मला एका गोष्टीचा समाधान वाटले नेतृत्व करणारे जे लोक आहेत मग ते देशाचे संरक्षण मंत्री असतील, देशाचे गृहमंत्री असतील त्यांनी अत्यंत समंजसपणाची भूमिका घेतली आणि एक गोष्ट सांगितली, कुठेतरी आमच्याकडून कमतरता आली ती कमतरता आली ही गोष्ट मान्य केली आहे, असे माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी सांगितले सासवड (ता पुरंदर) येथील आचार्यत्रि सभागृहामध्ये ज्येष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार यांच्या अभीष्टचिंतन सोहळ्याप्रसंगी माजी केंद्रीय मंत्री शरद पवार बोलत होते.



पवार म्हणाले की, दोन दिवस आपण पहलगामच्या दहशतवादी हल्ल्याबद्दल वाचतोय. अतिरेक्यांनी हल्ला केला. निष्पाप लोकांचा बळी गेला. जे काही घडले हा देशाला एक प्रकारचा धक्का होता. हा कुठल्या जाती धर्मावर धक्का नव्हता. हा भारताला धक्का होता हा भारतवासीयांवर हल्ला होता आणि भारतवासीयांवर ज्या वेळेला हल्ला होतो त्यावेळेस देशवासी म्हणून आपली जबाबदारी आहे. काश्मिरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्याशी चर्चा झाली. खासदार सुप्रिया सुप्रिया स्वतः त्यांच्याशी बोलल्या. त्यांनीही सांगितले की, काय वाटेल ती किंमत देऊ पण आम्ही इथले ऐक्य, बांधिलकी तुटू देणार नाही.

### धार्मिक विषारी स्वरूप देणे देशासाठी नुकसानकारक

» आम्हाला सर्व धर्म जाती यांची जबरदस्त सामूहिक शक्ती पाहिजे. आणि त्या शक्तीतून भारत हे शक्तिशाली राष्ट्र होईल याची काळजी घेतली पाहिजे आणि हा दृष्टिकोन तिथले मुख्यमंत्री घेतात, तिथली जनता घेते. ही आपल्या सगळ्यांच्या बाजूने अत्यंत जमेची बाजू आहे. म्हणून काही लोक याला धार्मिक विषारी स्वरूप देण्याचा प्रयत्न करत आहेत हे देशाच्या दृष्टीने अत्यंत नुकसान करणारे आहे आणि त्या रस्त्याने आपण जाता कामा नये, असे शरद पवार यांनी नमूद केले.

### त्यावेळी मत भिन्नता नाही

» राजकारणामध्ये मत भिन्नता असतील पण ज्या वेळेला देशावर हल्ला होतो त्यावेळेला मत भिन्नता नाही. आम्हा लोकांना विचारले काय भूमिका घ्यायची? आता भूमिका एकच देश एकत्र आहे आणि देश एकत्र म्हणून या सगळ्या गोष्टींचा विचार करायला हवा. कमतरता असतील, काही चुका असतील त्यानंतर काढू, असे शरद पवार यांनी सांगितले.